महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत.

(CIN No. U40109MH2005SGC153646)

कार्यकारी अभियंता,
अति उच्च दाब संवसु विभाग
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत
मिरजोळे रोड.एम.आय.डी.सी.रत्नागिरी ४१५ ६३९
दुरध्वनी क्रमांक ०२३५२– २३१३८८ (का.)
फॅक्स नंबर ०२३५२ – २२८००३ (फॅक्स)
E-mail – ee3220@mahatransco.in
Website : www.mahatranco.in

जावक क्रं.काअ/अउदा संवसु विभाग/रत्ना/मासं/ No 01393 दिनांक 11 OCT 2022

शिकाऊ उमेदवार कायदा, १९६१ अंतर्गत वर्ष २०२१ – २०२२ करीता अउदा संवसु विभाग, रत्नागिरी येथे निवड झालेल्या उमेदवारांची ०२ री तात्पुरती निवड यादी.

१. शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ च्या अंतर्गत या विभागीय कार्यालयाकडुन राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) मान्यता प्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेमधुन विजतंत्री (Electrician) या व्यवसायातुन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांकडुन शासनाच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १२.०७.२०२१ पर्यंत होती.

**२. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. १२०७, दि. ३०.०८.२०२२ अन्वये शिकाऊ उमेद्वारांची तात्पुरची निवड यादी तथा प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली होती. तद्नंतर आता उर्वरीत जागा भरण्याकरीता दुसरी निवड यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.**

३. शिकाऊ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी त्यांना एसएससी व आयटीआय विजतंत्री (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरी नुसार तयार करण्यात आलेली आहे.

४. ज्या दोन किंवा अधिक शिकाऊ उमेदवारांचे एकुण गुण समान आहेत अशा शिकाऊ उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवुन त्यांच्यातील जेष्ठ शिकाऊ उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे.

५. तात्पुरती निवड झालेया सर्व शिकाऊ उमेदवारांना त्यांची शैक्षणीक अर्हता, वय, जात, उन्नत गटात मोडत नसणे इत्यादी बाबतचे सर्व मुळ प्रमाणपत्र /कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल व सादर करु न शकलेल्या शिकाऊ उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणुन शिकाऊ उमेदवारासाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरती स्वरुपात असुन, पूर्णतः शिकाऊ उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या अधीन राहुन आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणुन निवड होणेसाठी आवश्यक असलेली पुर्वावश्यकता धारण करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असल्यास संबंधीत उमेदवारी/निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

७. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश असलेला शिकाऊ उमेदवार कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळुन आल्यास अथवा कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदत्र पडताळणीमध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास प्रतिक्षा यादी कार्यान्वित करण्यात येवुन त्या यादीतील शिकाऊ उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात यईल. सदर प्रतिक्षा यादीतील शिकाऊ उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असुन देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास त्या खालील गुणवत्ता धारक शिकाऊ उमेदवाराची स्वतंत्र निवड/प्रतिक्षा यादी लावण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग रत्नागिरी राखुन ठेवत आहेत.

८. तात्पुरत्या निवड यादी तयार करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग रत्नागिरी राखुन ठेवत आहेत.

९. निवड न झालेल्या शिकाऊ उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार अउदा संवसु विभाग, रत्नागिरी या कार्यालयाकडे करु नये. शिकाऊ उमेदरांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची या कार्यालयाकडुन दखल घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, रत्नागिरी या विभागात निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारांची तात्पुरती निवड यादी खालील प्रमाणे.

**PROVISONAL SELECT LIST**

| Sr. No | Application Code | Candidate Name | Caste Category | Remark |
|---|---|---|---|---|
| 1 | AP0721139713 | PRATHAM SANTOSH CHAUDHARI | OBC | |
| 2 | AP0721156727 | ABHISHEK ARJUN SHINDE | EWS | |
| 3 | AP072170271 | GITE VISHAL SUNIL | OBC | |
| 4 | AP072100564 | BHIMASHANKAR VYANKOBA BHOSIKAR | OBC | |

१०. तात्पुरती निवड यादी (Provisional Select List) मधील उमेदवारांनी कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, रत्नागिरी, कांचन हॉटेल शेजारी एम.आय.डि.सी. मिरजोळे, रत्नागिरी पिन कोड नं. ४१५६३९ या पत्यावर कार्यालयीन दिवशी (शनिवार, रविवार वगळुन) **सकाळी १०:००** ते सायंकाळी ६:२५ या कार्यालयीन वेळेत हजर रहावे.

११. कागदपत्रे पडताळणी करीता येणा–या शिकाऊ उमेदवारांना कुठल्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा इतर खर्च दिला जाणार नाही. शिकाऊ उमेदवारांना स्वखर्चाने कागदपत्र पडताळणी करीता उपस्थित राहावे लागेल.

(जितेंद्र पाथरे)
कार्यकारी अभियंता (प्रभारी)
म.रा.वि.पा.कं.मर्यादित,
अउदा संवसु विभाग, रत्नागिरी.

प्रत सविनय सादर :– अधीक्षक अभियंता, अउदा संवसु मंडल कोल्हापूर.